


# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २५.०२.२०२६ | अंक नं. २७२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

सोनेतारण कर्ज
१० ग्रॅमसाठी १२%
फक्त १० मिनिटात रु. ७०,०००/-
मुदतठेव १३ महिने १०% | वाहन कर्ज योजना ११% | दामदुप्पट ठेव योजना ९० महिने
कैलास नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
मुख्य कार्यालय : श्रीरंग अपार्टमेंट, शनि मंदिरासमोर, गुजरगल्ली, स्वामी विवेकानंद चौक, अ.नगर. फोन : २३४५९८३.

अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
कॉन्ट्यूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
FREE हनिमून टूर
१ डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

समता पतसंस्था
नो रिस्क, रिटर्न्स फिक्स
११००+ कोटींच्या ठेवी
ठेवींवर मिळवा १०% पर्यंतचे व्याज
लिक्विडिटी बेस प्रोटेक्शन स्कीम अंतर्गत ठेवीदारांच्या ठेवी, पूर्णपणे सुरक्षित.
संपर्क : ७७२२ ०१० २२२
४० वर्षे ग्राहकांच्या विश्वासाची!

दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ 888/-*
22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar.
Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

हॉटेल भारत भुवन दुर्गा लस्सीची
* स्पेशल/साधी लस्सी * स्पेशल मँगो लस्सी * स्पेशल अंजीर लस्सी * स्पेशल गुलकंद लस्सी
स्वाद घेण्यासाठी अवश्य एकदा भेट द्या.
पत्ता : हॉटेल भारत भुवन, माळीवाडा वेशीजवळ, अहिल्यानगर
पार्सल सुविधा उपलब्ध

## राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकीवरील स्थगिती उठली; 'नगर जिल्हा सहकारी बँके'सह 'सोसायट्यां'चा मार्ग मोकळा

नगर – राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांची प्रतीक्षा अखेर संपली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पुढे ढकलण्यात आलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया आता 'जैसे थे' थांबल्या होत्या, तेथूनच तातडीने सुरू करण्याचे आदेश राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने दिले आहेत. प्राधिकरणाचे सचिव अशोक गाडे यांनी २४ फेब्रुवारी रोजी यासंदर्भातील अधिकृत आदेश निर्गमित केले असून, यामुळे राज्यातील हजारो सहकारी संस्थांमध्ये आता निवडणुकीचे वारे वाहू लागणार आहेत.

राज्य शासनाने ५ डिसेंबर २०२५ रोजीच्या आदेशान्वये, राज्यातील नगरपालिका, नगरपंचायती आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका विचारात घेऊन सहकारी संस्थांच्या निवडणुका तात्पुरत्या स्थगित केल्या होत्या. केवळ उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिलेल्या संस्थांच्या निवडणुका यातून वगळण्यात आल्या होत्या. मात्र, नुकत्याच १० फेब्रुवारी २०२६ पर्यंत राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या 'सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या असून उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला नाही. त्यामुळे सहकारी संस्थांच्या निवडणुका ज्या टप्प्यावर स्थगित झाल्या होत्या, त्या त्याच टप्प्यापासून पुढे सुरू कराव्यात. अ आणि ब वर्गातील ज्या संस्थांची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाली आहे, त्यांचा सुधारित निवडणूक कार्यक्रम जिल्हा किंवा तालुका निवडणूक अधिकाऱ्यांनी तयार करून प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी पाठवायचा आहे. प्राधिकरणाची मान्यता मिळाल्यानंतर या कार्यक्रमाला व्यापक प्रसिद्धी दिली जाईल. विशेष म्हणजे, संघीय संस्थांच्या निवडणुकांसाठी ज्या सभासद संस्थांनी आधीच आपले प्रतिनिधी ठराव सादर केले आहेत, त्यांना पुन्हा नवीन ठराव देण्याची आवश्यकता भासणार नाही. तसेच अ, ब, क, ड वर्गातील ज्या सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाचा कार्यकाळ संपला आहे किंवा लवकरच संपणार आहे. त्यांच्या प्रारूप मतदार याद्यांचा कार्यक्रम सुरु करण्यात यावा असेही या आदेशात म्हंटले आहे.

### जिल्हा सहकारी बँकेसह सेवा सोसायट्यांच्या निवडणुका होणार

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाचा कार्यकाळ फेब्रुवारीमध्येच संपत आहे. या शिवाय जिल्ह्यातील काही सेवा सोसायट्यांचा कार्यकाळ २०२५ मध्ये संपला असून काही सोसायट्यांचा मार्च २०२६ अखेरीस संपणार आहे. त्यामुळे या संस्थांच्या निवडणुका ऐन उन्हाळ्यात होणार आहेत.

जिल्हा सहकारी बँकेची मागील निवडणूक २० फेब्रुवारी २०२१ मध्ये झाली होती बँकेच्या २१ जागांपैकी १७ जागा बिनविरोध झाल्या होत्या. तर उर्वरित ४ जागांसाठी मतदान झाले. सेवा सोसायटी मतदार संघातील नगर, पारनेर, कर्जत तर बिगरशेती संस्था मतदार संघात एक अशा ४ जागांसाठी जिल्हा बँकेची निवडणूक झाली होती. माजी मंत्री स्व. शिवाजीराव कर्डीले नगर सेवा सोसायटी मतदार संघातून उभे होते. त्यांच्या विरुद्ध महाविकासआघाडीच्या सत्यभामाबाई बेरड यांनी निवडणूक लढविली होती. पारनेर सोसायटी मतदार संघात स्व.उदय शेळके विरुद्ध रामदास भोसले यांच्यात लढत झाली होती. कर्जतमध्ये तिरंगी लढत झाली. तर बिगरशेती मतदार संघात संचालक दत्ता पानसरे विरुद्ध प्रशांत गायकवाड अशी दुरंगी लढत झाली होती.

## एमआयडीसी येथे भरदिवसा कारमधून रोकडची चोरी; गुन्हा दाखल

नगर – एमआयडीसी येथील दूध डेअरी चौक परिसरात आनंद सुपर मार्केटसमोर पार्क केलेल्या कारमधून भरदिवसा २० हजार रुपयांची रोकड आणि महत्त्वाची कागदपत्रे चोरून नेल्याची घटना २४ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ ते १२.३० या कालावधीत घडली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

वडगाव गुप्ता येथील रहिवासी अनिल गोरक्षनाथ बडाख हे २४ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास आपल्या कारने दूध डेअरी चौकात आले होते. त्यांनी आपली गाडी आनंद सुपर मार्केटसमोर उभी केली होती. अवघ्या दहा मिनिटांच्या कालावधीत चोरट्याने गाडीच्या डाव्या बाजूच्या सीटवर ठेवलेली पिशवी पळवून नेली. या पिशवीत १०० रुपये दराच्या २०० नोटा म्हणजेच एकूण २० हजार रुपये रोकड होती. तसेच बँक ऑफ बडोदा आणि पोस्टाचे पासबुक देखील चोरट्याने पळवले आहे.

सपोनि. चौधरी आणि पोलीस अंमलदार काळे यांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. फिर्यादी अनिल बडाख यांच्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (ब) नुसार गुन्हा नोंदवला आहे. पोलीस परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासून आरोपीचा शोध घेत आहेत.

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे
(आकर्षक पगार)
भेटा : कोहिनूर समोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

JOIN ONLY IN 4500/-
DiSHA Computer Institute
MS-OFFICE TALLY PRIME ADV. EXCEL 3 Month
CORELDRAW PHOTOSHOP CANVA 3 Month
CAD 2D CAD 3D PHOTOSHOP 3 Month
C LANG C++ HTML 3 Month
ENROLL NOW...
Other Courses Also In 4500/-
Core Python | Adv Python | Core Java | Adv Java
SQL & PL SQL | Power BI With Excel | Digital marketing
Delhi Gate Branch 9371051769 | Old ST stand Branch 9371151769 | Pipeline Branch 7447761769






अहिल्यानगर शहरातील एक जागरूक व्यक्तीमत्व व जुन्या काळातील प्रसिद्ध क्रिकेटपटू विकेटकिपर, शहराच्या नागरी समस्यांच्या सोडवणुकीसाठी अतिशय जागरूकतेने अभ्यासपूर्ण व कायदेशीर प्रयत्न करणारे...
श्री. मुकुंद शांताराम देवगावकर
(वय ६५, रा. लक्ष्मीकारंजा) यांना अहिल्यानगर महापालिकेच्या स्वीकृत नगरसेवकपदी संधी मिळावी यासाठी सदिच्छा व शुभेच्छा!
शुभेच्छूक
मुकुंद देवगावकर मित्र मंडळ
व अहिल्यानगर शहरातील समस्त ज्येष्ठ नागरिक

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाच्यावतीने ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त चित्रकला व पोस्टर स्पर्धा

नगर - अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त चित्रकला व पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली असल्याची माहिती शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी दिली.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर पोलिस शहर उपविभागाच्या निर्भया पथकाने या स्पर्धेचे आयोजन केले आहे. ही चित्रकला स्पर्धा चार विविध गटांमध्ये आयोजित करण्यात आली असून यामध्ये अ) चित्रकला स्पर्धा गट क्रमांक ०१ मध्ये इयत्ता चौथीपर्यंत विषय १) मी पाहिलेला पोलीस, २) वृक्षारोपण, ३) प्राणी आपले मित्र, ४) माझ्या स्वप्नातील शाळा, ५) विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार विषय तर ब) चित्रकला स्पर्धा गट क्र ०२ - इयत्ता पाचवी ते सातवी करिता चे विषय १) रस्त्याने नियम व पाळत शाळेत जाणारे बहिण भाऊ, २) स्वच्छ भारत हरित भारत, ३) वाहतूक नियंत्रण करणारे पोलीस दादा, ४) स्व : संरक्षण करणाऱ्या मुली हे विषय आहेत.

क) पोस्टर स्पर्धा गट क्रमांक ०३ मध्ये इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी विषय क्रमांक १) आरोग्यदायी जीवनशैली २) विविध व्यसनांमुळे होणारे दुष्परिणाम ३) स्वच्छ नगर सुंदर नगर, ४) बेटी बचाव बेटी पढाव हे विषय आहेत. तर ड) पोस्टर स्पर्धा खुला गट क्रमांक ०४ महाविद्यालयीन विद्यार्थी व हौशी चित्रकार यांच्याकरिता विषय १) सोशल मीडियाचा गैरवापर व सामाजिक धोका, २) महिलांची सुरक्षितता व कायद्याचे योग्य ज्ञान, ३) सायबर गुन्हे आणि ऑनलाईन फसवणूक, ४) अंमली पदार्थ व निर्मूलन हे विषय देण्यात आले आहेत.

ही चित्रकला स्पर्धा ८ मार्च रोजी पोलीस मुख्यालय (कवायत मैदान) अहिल्यानगर येथे सकाळी ८:३० ते १० या वेळेत होणार आहे. या स्पर्धेत स्पर्धकांनी सहभागी व्हावे.

स्पर्धेविषयी अधिक माहितीसाठी महिला पोलीस कॉन्स्टेबल प्रतिभा नागरे ८७८८७४७८८७ व पोलीस कॉन्स्टेबल संदीप थोरात ७९७२६६४८०७ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन शहर विभागाचे पोलीस उपधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी केले आहे.

## श्री भगवान महावीर स्वामी व श्री सुमतीनाथ जैन मंदिरात प्रवेश करून पहाटेच्यावेळी चार जणांकडून दरोड्याचा प्रयत्न

### डॉ. राजेंद्र पिपाडा व त्यांच्या अंगरक्षक पोलिसाच्या धाडसामुळे मोठा अनर्थ टळला

राहाता - राहाता येथील श्री सुमतीनाथ जैन मंदिरामध्ये दरोडा टाकण्याचा प्रयत्न २४ फेब्रुवारीला पहाटे करण्यात आला. चार अज्ञात दरोडेखोरांनी मंदिर परिसरात प्रवेश करून मंदिराचा दरवाजा तोडुन दानपेटी चोरुन नेण्याचा प्रयत्न केला. मात्र तेथुन जवळच राहणारे डॉ. राजेंद्र पिपाडा व त्यांच्या अंगरक्षक पोलिसाने दाखविलेल्या धाडसामुळे आणि सतर्कतेमुळे चोरट्यांनी तेथून पळ काढल्याने संभाव्य मोठा अनर्थ टळला आहे.


राहाता येथील श्री सुमतीनाथ जैन मंदिरात झालेल्या दरोड्याच्या प्रयत्नाबाबत माहिती देताना डॉ. राजेंद्र पिपाडा.

याबाबत डॉ.पिपाडा यांचे अंगरक्षक असलेले पोलिस शैलेश मोहन भोयर यांनी राहाता पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. डॉ.राजेंद्र पिपाडा यांचे घरामागे श्री सुमतीनाथ जैन मंदिर आहे. तसेच शेजारीच संतोष लोढा यांचे घर आहे. २४ फेब्रुवारी रोजी पहाटे ३ च्या सुमारास श्री सुमतीनाथ जैन मंदिर येथे असलेले पुजारी विनायक गजानन देशपांडे यांना संतोष लोढा यांनी फोन केला परंतु त्यांचा फोन बंद लागल्याने त्यांनी राजेंद्र पिपाडा यांना फोन केला की श्री सुमतीनाथ जैन मंदिर येथे चोर आल्याचे दिसत आहे असे कळविल्याने राजेंद्र पिपाडा यांनी अंगरक्षक भोयर यांना फोन करुन जैन मंदिरा जवळ बोलावले. भोयर तातडीने तेथे गेले असता, तेथे दोन अनोळखी इसम मंदिराचे ओट्यावर व दोन इसम मंदिराचे मागील बाजुला उभे असल्याचे दिसले, त्यावेळी त्यांनी त्या इसमांना कोण आहे, कोण आहे असे जोरात ओरडत विचारले. त्यातील एका तोंड बांधलेल्या इसमाने त्याचे हातातील असलेला लोखंडी रॉड त्यांच्या अंगावर अंगावर उगारला त्यावेळी मागे सरकत त्यांनी तो वार हुकवला. तेवढ्यात तेथे डॉ. पिपाडाही आले. त्या दोघांनी आरडा ओरडा सुरु करताच सर्व चारही चोरटे मंदिराचे मागील बाजूने पळून गेले.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी रात्री तात्काळ जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे व अतिरिक्त पोलिस अधिक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्याशी संपर्क साधला. त्यांच्या तत्परतेमुळे पोलिस यंत्रणा त्वरित सक्रिय झाली आणि घटनास्थळी पोलिसांचा मोठा फौजफाटा दाखल झाला.तपासासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकही पाचारण करण्यात आले. मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन व ठसे तज्ञ यांच्या मदतीने तपासाला वेग देण्यात आला. या सतर्कतेमुळे मंदिरातील मोठे आर्थिक नुकसान तसेच संभाव्य जीवितहानी टळल्याचे प्राथमिक माहितीवरून स्पष्ट होत आहे.

यावेळी अधिक माहिती देताना डॉ.राजेंद्र पिपाडा यांनी नागरिकांना आवाहन केले. आपल्या परिसरात कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास तत्काळ पोलिसांना कळवावे. मंदिर व सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही, सुरक्षा रक्षक व प्रकाशव्यवस्था सक्षम ठेवावी. अनोळखी व संशयास्पद व्यक्तींवर लक्ष ठेवून स्थानिक प्रशासनाला माहिती द्यावी. या घटनेची पाहणी करण्यासाठी सकाळी शिर्डीचे पो.नि.रणजित गलांडे, राहाता पो.नि. नितीन चव्हाण आले होते.यावेळी प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ.ममता पिपाडा, संघपती अनिल पिपाडा, मदनलाल पिपाडा, महावीर पिपाडा, निखील पिपाडा, साहील पिपाडा, महेंद्र पिपाडा, ललित धाडीवाल, निलेश पिपाडा आदी उपस्थित होते.

## आनंदधाम येथे प्रवचनाच्यावेळी तात्काळ उपचार मिळाल्याने भाविकाला जीवनदान

नगर - आनंदधाम येथे पंन्यास प्रवर पूज्य चारित्ररत्न विजयजी महाराजा साहेब यांची तीन दिवसीय हृदय परिवर्तन प्रवचन माला सुरू आहे. सकाळी ९ वाजता प्रवचन होत असून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून गुरूदेवांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेत आहेत. मंगळवारी सकाळी प्रवचन सुरू असताना एक भाविक पनालाल कटारिया यांच्या हालचाली बंद पडल्याचे निदर्शनास आले. यावेळी उपस्थित डॉ. अरविंद गुगळे आणि डॉ. अभय मुथा यांनी तातडीने कटारिया यांची तपासणी केली असता त्यांचे शरीर थंडगार पडल्याचे दिसून आले. दोन्ही डॉक्टरांनी तातडीने सीपीआर देऊन ॲक्युप्रेशर थेरपी दिली. त्यामुळे कटारिया यांच्या हालचाली पूर्ववत सुरू झाल्या व नंतर त्यांना पुढील उपचारासाठी हलवण्यात आले. कटारिया यांच्यावर उपचार सुरू असताना काही काळ सर्वच जण चिंतेत पडले होते. मात्र गुरूदेवांचे आशीर्वाद आणि डॉक्टरांची तत्परता यामुळे कटारिया यांना नवीन जीवन मिळाले. उपस्थित सर्वांनीच सुटकेचा निःश्वास सोडत गुरूदेवांचे आणि डॉक्टरांचे आभार मानले. आपत्कालीन परिस्थितीत कटारिया यांच्यासाठी डॉक्टर देववदूतासारखे धावून आले अशीच भावना सर्वांनी व्यक्त केली.


आनंदधाम येथे सकाळी प्रवचन सुरू असताना भाविक पनालाल कटारिया यांच्या हालचाली बंद पडल्याचे निदर्शनास आल्यावर डॉ. अरविंद गुगळे आणि डॉ. अभय मुथा यांनी तातडीने त्यांची तपासणी केली.

# तुरूंगाधिकारी व पोलिसांच्या चौकशीचे न्यायालयाचे आदेश

### ८२ पैकी ७५ तारखांना आरोपी गैरहजर, खटल्यास विलंब झाल्याने तीव्र नाराजी

नगर - पोक्सो प्रकरणातील संशयित आरोपीला तब्बल अडीच वर्षे विशेष न्यायालयासमोर नियमित हजर न केल्याप्रकरणी पाथर्डी येथील तुरूंगाधिकारी आणि पोलीस प्रशासनाच्या कार्यपध्दतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी दिलेल्या निर्दोष मुक्ततेच्या निकालानंतर विशेष पोक्सो न्यायालयाने कठोर भूमिका घेत संबंधित अधिकार्यांविरूध्द चौकशी करण्याचे आदेश पोलीस अधीक्षकांना दिले आहेत.

सदर प्रकरणात संशयित दीपक उर्फ विशाल रमेश गायकवाड याच्याविरूध्द अत्याचार, पोक्सो आदी कलमान्वये २७ जून २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर २८ जुलै २०२३ रोजी पाथर्डी पोलिसांनी गायकवाड याला अटक केली होती. मात्र, खटल्याच्या सुनावणीदरम्यान एकूण ८२ तारखा पडूनही त्याला केवळ पाच वेळा प्रत्यक्ष आणि दोन वेळा व्हिडीओ कॉन्फरन्सिंगव्दारे न्यायालयात हजर करण्यात आले. उर्वरित ७५ तारखांना संशयित आरोपी न्यायालयात हजरच करण्यात आला नव्हता. या प्रकारामुळे खटल्याच्या प्रक्रियेत मोठा विलंब झाला. विशेष न्यायालयाचे न्यायाधीश डॉ. यू. जे. मोरे यांनी निकालात नमूद केले की, आरोपीला विशेष न्यायालयासमोर नियमितपणे न हजर केल्यामुळे आरोप निश्चितीस विलंब झाला आणि परिणामी संपूर्ण खटल्याच्या निकालालाही उशीर झाला.

न्यायालयाने संबंधित अधिकार्यांचे वर्तन भयानक व धक्कादायक असल्याचे स्पष्ट शब्दांत नमूद केले आहे. तुरुंगातील आरोपींना न्यायालयात हजर करणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे. विशेष म्हणजे, १७ डिसेंबर २०२५ रोजी आरोपीच्या जामीन अर्जावरील आदेश देताना न्यायालयाने खटला दररोज चालविण्याचे निर्देश दिले होते. तसेच काही महिन्यांत खटला निकाली काढणे शक्य असल्याचे निरीक्षणही नोंदवले होते.

सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी अभियोक्ता ॲड. मनीषा पी. केळगंद्रे-शिंदे यांनी काम पाहिले. आरोपीला न्यायालयात नियमित हजर केले जात नसल्याची बाब त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली होती. चौकशीदरम्यान आरोपीचे वॉरंट गहाळ झाल्याची बाब समोर आली. त्यानंतर न्यायालयाने नव्याने प्रोडक्शन वॉरंट जारी केल्यावर आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले आणि पुढील सुनावणी जलदगतीने पार पडली.

## १९ वर्षीय विवाहित तरुणीचा विहिरीतील पाण्यात बुडून मृत्यू

नगर- नगर तालुक्यातील निंबोडी येथील एका १९ वर्षीय विवाहित तरुणीचा पाण्यात पडल्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना २४ फेब्रुवारीला दुपारी उघडकीस आली. अंतरा सागर आवारे (रा. निंबोडी, ता.नगर) असे मृत तरुणीचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अंतरा आवारे ही सकाळी ९ वाजेपासून घरातून बेपत्ता झाली होती. तिचे कुटुंबीय तिचा शोध घेत होते. काही नातेवाईक भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात मिसिंग ची तक्रार देण्यासाठीही आले होते. दरम्यान गावच्या परिसरात तिचा शोध घेत असलेल्या काहींना दुपारी एका विहिरी जवळ तिच्या चपला दिसल्या. त्यामुळे विहिरीतील पाण्यात तिचा शोध घेण्यात आला. बराच वेळ शोध घेतल्यानंतर ती विहिरीच्या तळाशी बुडालेल्या अवस्थेत आढळून आली. तिला पाण्यातून बाहेर काढत उपचारासाठी तातडीने तिचे नातेवाईक मिनीनाथ आवारे यांनी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच तिचा मृत्यू झाला होता. जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शिंदे यांनी याप्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्याला माहिती दिली.

या माहितीवरून कॅम्प पोलीस स्टेशन, भिंगार येथे भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १९४ नुसार अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेने निंबोडी गावावर शोककळा पसरली असून, ही आत्महत्या आहे, की अपघात याचा पोलीस सर्व बाजूने तपास करत आहेत. मयत अंतरा आवारे हिच्या पश्चात पती, सासू, सासरे, २ नणंदा असा परिवार आहे.

## नगर शहरासह एमआयडीसीचा पाणीपुरवठा खंडित होण्याची शक्यता

### बिगर सिंचनाच्या थकबाकी वसुलीसाठी मुळा पाटबंधारे विभागाने काढल्या नोटीसा

नगर - सुमारे २४ कोटी ६४ लाख रुपयांच्या बिगर सिंचनाच्या थकबाकी वसुलीसाठी मुळा पाटबंधारे विभागाने महापालिकेसह एमआयडीसी तसेच तीन सहकारी साखर कारखाने, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, विविध ग्रामपंचायतींना पाणीपुरवठा खंडित करण्याच्या नोटिसा पाठवल्या आहेत. मुळा पाटबंधारे विभागाच्या या नोटिसीमुळे अहिल्यानगर शहरासह एमआयडीसीचा पाणीपुरवठा खंडित होण्याची टांगती तलवार निर्माण झाली आहे.

या सर्व थकबाकीदारांना यापूर्वी बिगर सिंचनाच्या वसूलीसाठी तीन वेळेला नोटीसा बजावण्यात आल्याची व आता अंतिम नोटीस बजावल्याची माहिती मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील यांनी दिली. पाणीपट्टीसह लोकल फंड, विलंब आकार, दंडणीय आकार अशी ही एकूण २४ कोटी ६४ लाख रुपयांची थकबाकी आहे. अहिल्यानगर शहरासह एमआयडीसी तसेच विविध पाणीपुरवठा योजनांसाठी मुळा धरणातून पाणीपुरवठा केला जातो.

औद्योगिक स्वरूपाची एकूण ८ कोटी ८ लाख रुपये, विविध नगरपालिकांकडे १ कोटी ६ लाख रुपये, ग्रामपंचायतींकडे ७ लाख ५९ हजार रुपये, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषदेचा ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडे १ कोटी ४३ लाख रुपये, महात्मा फुले कृषी विद्यापीठाकडे १५ लाख रुपये थकबाकी निर्माण झालेली आहे.

**विविध संस्थांकडील थकबाकी पुढीलप्रमाणे** - अहिल्यानगर एमआयडीसी ६ कोटी ८५ लाख, पांढरीपुल एमआयडीसी ७३ लाख, मुळा सहकारी साखर कारखाना ८ लाख, लोकनेते घुले पाटील ज्ञानेश्वर साखर कारखाना ३० लाख ९१ हजार, वृद्धेश्वर साखर कारखाना १२ लाख ७४ हजार अशी ही औद्योगिक क्षेत्राची एकूण ८ कोटी ८ लाख रुपयांची थकबाकी आहे.

तर राहुरी पालिकेकडे ४७ लाख ४७ हजार रुपये, देवळाली प्रवरा पालिकेकडे १ कोटी ६ लाख, राहुरी तालुक्यातील सडे पिंप्री, वांबोरी व नेवाशातील शनी शिंगणापूर या ग्रामपंचायतीकडे ७ लाख ५९ हजार रुपये, टंचाई काळातील ग्रामपंचायतींकडे ४३ लाख रुपये, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषदेचा ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांच्याकडे १ कोटी ४३ लाख रुपये, महात्मा फुले कृषी विद्यापीठाकडे १५ लाख २५ हजार रुपये अशी ही एकूण पिण्याच्या पाण्याची वर्षभरातील १६ कोटी ५५ लाख रुपये तर विलंब आकार, दंडणीय आकार यासह एकूण २४ कोटी ६४ लाख रुपयांची थकबाकी आहे. थकबाकीच्या वसुलीच्या या नोटिसा मुळा पाटबंधारे विभागाच्या उपकार्यकारी अभियंता धनश्री शिंदे यांच्या सहीने बजावण्यात आल्या आहेत.

### महापालिकेकडे १३.४० कोटींची थकबाकी

मुळा पाटबंधारे विभागाची एकूण विविध संस्थांकडे २४ कोटी ६४ लाख रुपयांची थकबाकी आहे. त्यातील एकट्या महापालिकेची १३ कोटी ४० लाख रुपयांची थकबाकी आहे. महापालिकेने गेल्या सन २०२५-२६ या वर्षात कोणतीही रक्कम मुळा पाटबंधारे विभागाकडे अदा केलेली नाही, असेही नोटीसीमध्ये नमूद करण्यात आले आहे. यापूर्वी थकबाकी जमा करण्यासाठी वेळोवेळी सूचना देण्यात आली, परंतु महापालिकेने दखल घेतली नाही. त्यामुळे करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार थकीत रक्कम न भरल्यास कोणत्याही क्षणी पाणीपुरवठा खंडित केला जाईल व त्यामुळे उद्भवणाऱ्या जनक्षोभास महापालिका जबाबदार असेल, असे नोटिसीमध्ये नमूद करण्यात आले आहे.

## पवनकुमार अत्री यांचे अल्प आजाराने निधन



नगर - गोविंदपुरा येथील रहिवासी पवनकुमार हरबन्सराज अत्री (वय ७०) यांचे २५ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुली, १ मुलगा, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कोठला, राज चेंबर्स येथील कपील स्पोर्टस्चे ते संचालक होत.

## ठकुबाई कोलते यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - बोल्हेगाव गावठाण कोलते, वस्ती जिल्हा परिषद शाळेजवळील रहिवासी ठकुबाई उमाजी कोलते (वय ९०) यांचे २५ फेब्रुवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बोल्हेगाव सिना नदी येथे अंत्यसस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. भिवसेन व किसन कोलते यांच्या त्या आई तर नवनाथ व रामचंद्र कोलते यांच्या आजी होत.



**हनुमान चालिसा पाठ**

**गुरुवार दि. २६/०२/२०२६**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**

**एस. पी. ग्रुप,** चिनी टेलर शेजारी, मिस्कीन रोड, तारकपूर ८९९९०११७६२

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**

**आदिशक्ती सार्वजनिक मित्र मंडळ,** स्वामी अपार्टमेंट जवळ, दत्त मंदिर, आनंदनगर, स्टेशन रोड, गणेश लालबागे, ९८२३९३८००७, रुपेश गायकवाड ९४९४२१००००

## सासऱ्याचा गळा आवळून खून करणारा जावई व त्याचा मित्र जेरबंद; डोंगरात आढळला होता मृतदेह, खुनाच्या गुन्ह्याची ३ दिवसांत उकल

नगर - पारनेर तालुक्यातील ढवळपुरी शिवारातील डोंगरात मृतदेह आढळलेल्या वृद्धाच्या खुन प्रकरणाची स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या तीन दिवसांत उकल करत सासऱ्याचा गळा आवळून खून करणाऱ्या जावयाला त्याच्या मित्रासह जेरबंद केले आहे. या घटनेमुळे पारनेर तालुक्यात खळबळ उडाली आहे.

२२ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजण्यापूर्वी ढवळपुरी शिवार (ता.पारनेर) येथे रामदास निवृत्ती सोनवणे (वय ५५, रा. निमगाव सावा, ता. जुन्नर, जि. पुणे) यांचा अज्ञात व्यक्तीने गळा आवळून खून केल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी फिर्यादी तुळशीराम निवृत्ती सोनवणे (वय ५८, रा. सुलतानपूर, ता. जुन्नर, जि. पुणे) यांनी फिर्याद दिल्यानंतर पारनेर पोलीस स्टेशन येथे बीएनएस कलम १०३ (१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.


सासऱ्याचा गळा आवळून खुन करणारा जावई व त्याचा मित्र या दोघांना जेरबंद केल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला या गुन्ह्याची तात्काळ उकल करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पो.नि. किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कार्यरत झाले. पथकात उपनिरीक्षक संदीप मुरकुटे तसेच पोलीस अंमलदार अतुल लोटके, फुरकान शेख, दिपक घाटकर, रिचर्ड गायकवाड, अमृत आढाव, रमिझराजा आत्तार, आकाश काळे, विशाल तनपुरे, प्रशांत राठोड व चालक उत्तरेश्वर मोराळे यांचा समावेश होता.

घटनास्थळाची पाहणी व गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपी निष्पन्न केले. तपासा दरम्यान मयताचा जावई अमित नारायण डुकरे (वय ३४, रा. पारगाव तर्फे आळे,ता.जुन्नर,जि. पुणे) व त्याचा मित्र अमोल उत्तम डुकरे (वय ३१, रा.औरंगपूर, ता. जुन्नर,जि.पुणे) यांनी मिळून हा खून केल्याचे निष्पन्न झाले. २५ फेब्रुवारी रोजी दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपी अमित डुकरे याने कबुली दिली की त्याची पत्नी गेल्या एक वर्षापासून नांदत नव्हती. त्यांना सव्वा वर्षांची मुलगी आहे. सासरे वारंवार वाद घालून मुलीला मारून टाकण्याची धमकी देत होते.याच रागातून आरोपींनी रामदास सोनवणे यांना कारमध्ये बसवून ढवळपुरी शिवारात नेले व गळा आवळून खून करून मृतदेह डोंगरात फेकून दिला. दोन्ही आरोपींना पुढील तपासासाठी पारनेर पोलीस स्टेशन येथे हजर करण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

## डॉ.पाऊलबुद्धे फार्मसी कॉलेजमध्ये 'स्टार्टअप टॉक सिरीज'ला प्रतिसाद

नगर - वसंत टेकडी येथील डॉ. ना.ज. पाऊलबुधे फार्मसी कॉलेजमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे वतीने स्टार्टअप टॉक सिरीज-तरुण उद्योजकांशी संवाद या उपक्रमांतर्गत मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. बिहाइंड द स्टार्टअप - उद्योजक प्रवासावरील एक उद्योजकाचे मनोगत या विषयावर आयोजित कार्यक्रमाला विद्यार्थी व प्राध्यापकांचा प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करून सरस्वती पूजन करण्यात आले. तसेच विद्यापीठ गीत सादर करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून शार्प मल्टिमीडिया सर्व्हिसेस प्रा. लि.चे संस्थापक व संचालक उद्योजक शुभम पोपळे उपस्थित होते. यांनी आपल्या उद्योग प्रवासातील अनुभव विद्यार्थ्यांशी शेअर केले. स्टार्टअप सुरू करताना येणाऱ्या अडचणी, अपयश, जोखीम, आर्थिक नियोजन, टीमवर्क तसेच सातत्य व नवकल्पना शक्तीचे महत्त्व त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. त्यांच्या संवादात्म क सत्रामुळे विद्यार्थ्यांना उद्योजकते विषयी प्रत्यक्ष मार्गदर्शन मिळाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्याम पांगा, प्राचार्या अनुराधा चव्हाण, विभागप्रमुख फार्माकोग्नोसी यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांनी नोकरी शोधणारे न बनता रोजगारनिर्माते होण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले. त्यांनी स्टार्टअप संस्कृती आजच्या काळाची गरज असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास विभागप्रमुख डॉ. वेणू कोला, डॉ.रोशनी सूर्यवंशी, डॉ.प्रसाद घुगारकर, सौ.स्वाती कडनोर तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. स्टार्टअप व इनोव्हेशन सेलच्या समन्वयक प्रा.श्रद्धा मुंदडा यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.पूर्णिमा साळुंखे यांनी आभार मानले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेबद्दल प्रेरणा निर्माण होऊन स्टार्टअपकडे सकारात्मक दृष्टिकोन विकसित झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष राम बुचकूल, व्यवस्थापकीय संचालक साई पाऊलबुद्धे, सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, सदस्य रघुनाथ कारमपुरी सर्व संचालक मंडळानी शुभेच्छा दिल्या.



हिंद सेवा मंडळाचे रामकरण सारडा विद्यार्थीगृहात माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा व दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ झाला.

# माजी विद्यार्थ्यांच्या आदर्श घेऊन रामकरण सारडाच्या विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होऊन राष्ट्र उभारणीच्या कार्यात योगदान द्यावे

## ब्रिजलाल सारडा यांचे प्रतिपादन; हिंद सेवा मंडळाचे रामकरण सारडा विद्यार्थी गृहाच्या माजी विद्यार्थी संघाचा स्नेह मेळावा

नगर – कर्मण्येवाधिकारस्तेया ब्रीद वाक्यप्रमाणे हिंद सेवा मंडळाचे कार्य सुरू आहे. रामकरण सारडा विद्यार्थी गृहाची स्थापनेला ११३ वर्षाची परंपरा लाभलेली आहे. रामकरण सारडा विद्यार्थी गृहातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी हिंदसेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर, मानद सचिव संजय जोशी व हिंद सेवा मंडळाचे सर्व पदाधिकारी यांचे विशेष लक्ष आहे. रामकरण सारडा विद्यार्थी गृहाचे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात उच्चपदस्थ नोकरी व स्वतःचा व्यवसाय करीत आहेत. भगवद्गीते सांगितलेल्या निष्काम कर्मयोगाचे आचरण करावे. ध्येयवादी राहुन विद्यार्थ्यांनी माजी विद्यार्थ्यांच्या आदर्श घेऊन जीवनात यशस्वी होऊन राष्ट्र उभारणीच्या कार्यात योगदान द्यावे. आदर्श नागरिक बनावे, असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे माजी कार्याध्यक्ष ब्रिजलाल सारडा यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाचे रामकरण सारडा विद्यार्थीगृहात माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा व दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ झाला. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी सारडा वस्तीगृहाला २४ खुर्ची, क्रीडा साहित्य, टी–शर्ट, स्वेटर व दिवंगत माजी विद्यार्थी कै.पांडुरंग सोन्याबापु दळवी यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदतीचा धनादेश देण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी उपप्राचार्य विश्वनाथ लाहोटी, हिंदसेवा मंडळाचे माजी कार्याध्यक्ष ब्रिजलाल सारडा, सिद्धार्थ सारडा, ह.सा.शिंदे, खेतमाळीस सर, साठे सर, बळीद सर, सुनील कुलकर्णी, ताकपिरे सर, सौ.मेघा ख्रिस्ती, वस्तीगृहाचे अधीक्षक बंडू भोसले, गजानन भांडवलकर, विशाल म्हस्के, सागर खळे, विकी निक्रड, अमोल बगाडे, अभिजीत भांडवलकर आदी उपस्थित होते.

विश्वनाथ लाहोटी म्हणाले, रामकरण सारडाचे माजी विद्यार्थी आजही सामाजिक बांधिलकी जपत वस्तीगृहाला भेट देऊन क्रीडा साहित्य मिष्ठान्न भोजन व मदत देऊन सहकार्य करीत आहे ही बाब कौतुकास्पद आहे.

या कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना असे सांगितले की, रामकरण सारडाच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी सर्वतोपरी मदत करू असे सांगितले. यावेळी ब्रिजलाल सारडा यांनी माजी विद्यार्थ्यांच्या संघाची स्थापना करुन विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी संघटना स्थापन करावी. यासाठी हिंदसेवा मंडळ सहकार्य करेन. सूत्रसंचालन बबन धनवडे यांनी केले. सुनील कुलकर्णी यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना मिष्ठान्न भोजन देण्यात आले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी माजी विद्यार्थी संघाचे नवनाथ ढोणे, आश्विन साठे, दत्तात्रय आग्रे, संतोष सुपेकर, किरण गायकवाड, ज्ञानेश्वर हळनोर, नवनाथ गायके, धर्मनाथ तांदळे, श्रीकांत बुधवंत, बाळू बुधवंत, अरुण नागरगोजे, उत्तम नगर आदींनी परिश्रम घेतले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## लोककला – स्वरुप आणि रंजन

"मुसाफिर"
वाचनीय मननीय
प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी
चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित
ललित चिंतन

भागवत हा भक्तिसंप्रदायाचा आत्मा आहे. भागवताने लीलासंकीर्तन घडवून भक्तिला आविष्काराच्या पातळीवर आणले आहे. हजारो श्लोकांचे महाभारत, पुराण रचूनही व्यासांच्या मनाला शांती लाभेना! केवळ शास्त्राचा आणि तत्त्वचिंतनाचा उहापोह केला तरी भगवंताचे भावपूर्ण गुणगायन झाल्याखेरीज समाधान मिळणार नाही. हे नारदांनी सांगितले आणि व्यासांनी भक्तिरसप्रधान, लालित्यपूर्ण भाषेतील रसाळ लीलादर्शी भागवत लिहिले. त्यात भगवंताच्या लीला असल्यामुळे त्याला आपोआपच नाट्यमयता लाभली. तेच भागवत संकीर्तनातून अधिक लोकाभिमुख झाले आणि त्याच लीला, दशावतार, भारूड, गौळणी, नौटंकी, शैव नाटक, भरतनाट्यम्, वैष्णव नाटक, कीर्तनिया अशी रूपे घेऊन आविष्कृत होऊ लागले. त्यातूनच पुढे प्रत्येक प्रांतात वेगवेगळ्या लोककला जन्माला आल्या.

मराठी लोककलेचे हे स्वरूप पाहता किमान हजार ते बाराशे वर्षांची परंपरा या लोककलांना लाभली आहे. मूळ परंपरेचा बाज तसाच ठेवत कालमानाप्रमाणे त्यात बदल करीत या लोककलावंतांनी हजारो वर्षे लोकरंजन घडविले आहे. लोकधर्म जागविला आहे आणि प्रबोधनही केले आहे.

मध्ययुगीन भक्त कवींनी भक्तिच्या अभिव्यक्तीसाठी आणि लोककलावंतांनी लोकदेवतेचे भक्तिरूप मांडण्यासाठी लोकछंदांचा, लोकगीतांचा, लोककथांचा, लोकपुराणांचा आणि लोकधारणांचा स्वीकार करून प्रयोगात्मक लोककलांचा प्रभावी वापर करून कथन–नाट्याची निर्मिती केली. अशा कथननाट्याचे मराठी भूमितील अस्सल मराठमोळे रूप म्हणजे कीर्तनाचे आख्यान. हेच आख्यान जागरण गोंधळीतील विधिनाट्याच्या रूपात या मातीच्या लोकरंगभूमीत रुजले.


उत्तर पेशवाईतल्या तमाशात वगनाट्य नव्हते. सन १८६५ च्या सुमारास शाहीर उमा बाबू या मातंग समाजातील गुराखी पोराने विष्णुदास भाव्यांचे सांगलीतील नाटक पाहून असे कथानक तमाशात का नसावे? असा विचार करून 'मोहना–बटाव' हा पहिला वग लिहिला आणि त्यानंतर तमाशात 'वर्ग' सादर होऊ लागला. पुढे तमाशाचे रूपांतर लोकनाट्यात झाले.

महाराष्ट्राच्या भूमीत विविध ठिकाणी या लोककला उदयास आल्या आणि महाराष्ट्रभर सादर होऊ लागल्या.

– किशोर गांधी

सुधीर दत्तात्रय फडके लिखित

# सर्वोपरि परात्परतत्व शिव पुस्तकाचे २८ फेब्रुवारीला नगरमध्ये प्रकाशन



नगर – शिवतत्व विवेचनावर आधारित असलेले 'सर्वोपरि परात्परतत्व शिव' या पुस्तकाचे प्रकाशन २८ फेब्रुवारी रोजी येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे सकाळी १०.३० वाजता होणार आहे, अशी माहिती या पुस्तकाचे लेखक सुधीर दत्तात्रय फडके यांनी दिली.

शिवमहापुराण कथा आणि निरुपणकार तसेच गहनानंदजी महाराज, उपाध्यक्ष, रामकृष्ण मठ बेलूर, कोलकाता यांच्यामार्फत गुरुदीक्षा प्राप्त शेखरजी गाडगे उर्फ बाळ गाडगे (नागपूर) यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन होत आहे. या कार्यक्रमास आध्यात्मिक त रननीसेच धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती असणार आहे, असे सांगण्यात आले.

'सर्वोपरि परात्परतत्व शिव' पुस्तकाचे लेखक सुधीर द. फडके हे जिल्हा परिषदेमध्ये विस्तार अधिकारी कृषी या पदावरून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांची आत्तापर्यंत कृषी विषयक पाच पुस्तके, लेहलडाख व नर्मदा परिक्रमा ही प्रवास वर्णने, गूढकथा, ज्योतिष, नामस्मरण चिंतन, भूकंप व त्याची कारणमिमांसा अशी २५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांनी विविध दैनिकांत कृषी विषयक लेखन केलेले आहे. सुधीर द. फडके यांच्या एका कृषी पुस्तकास महाराष्ट्र साहित्य परिषदेचा उत्कृष्ट साहित्यकृती पुरस्कार प्राप्त झालेला आहे. तसेच विविध सामाजिक संस्थांचे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.



स्नेहबंध फौंडेशनच्या वतीने अमली पदार्थविरोधी जनजागृती मोहिमेअंतर्गत पोस्टरचे अनावरण करताना संस्थापक डॉ. उद्धव शिंदे. समवेत शिक्षकवृंद, प्रशिक्षक व विद्यार्थी.

# नशामुक्त पिढी हिच राष्ट्राची ताकद : डॉ. उद्धव शिंदे

नगर – आजची युवा पिढी नशेच्या विळख्यात अडकू नये यासाठी वेळेत जनजागृती होणे आवश्यक आहे. व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी विद्यार्थी, पालक आणि समाजाने एकत्र येऊन अमली पदार्थांविरोधात ठाम भूमिका घ्यावी, असे आवाहन स्नेहबंध फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी केले.

स्नेहबंध सोशल फौंडेशन, अहिल्यानगर यांच्या वतीने अमली पदार्थांविरुद्ध लढा व व्यसनमुक्ती धोरणाची सुरुवात करण्यात आली. या जनजागृती मोहिमेचा प्रारंभ भिंगार येथील श्रीमती अॅबट मायादेवी गुरुदित्ताशाह हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज तसेच भिंगार स्पोर्ट्स क्लब येथे करण्यात आला. कार्यक्रमास पर्यवेक्षिका कविता शिंदे, शिक्षकवृंद, क्लबचे प्रशिक्षक विठ्ठल काळे व शंकर औरंगे व विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. उद्धव शिंदे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम स्पष्ट केले. व्यसनामुळे वैयक्तिक जीवन, कुटुंब व समाज कसा उद्ध्वस्त होतो, याची उदाहरणांसह माहिती देत विद्यार्थ्यांना नशेपासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी अमली पदार्थविरोधी जनजागृती पोस्टरचे अनावरण करण्यात आले. पोस्टरवर स्वस्थ जीवन, सुंदर भविष्य – नशेपासून दूर रहा, जीवनाला हो म्हणा, अमली पदार्थांना नाही म्हणा, मादक द्रव्याची नशा – अनमोल जीवनाची दुर्दशा अशा प्रभावी घोषणा आहेत.

# स्पर्धात्मक युगात केवळ शिक्षण पुरेसे नाही, तर त्यासोबत कौशल्य अत्यावश्यक

## शफाकत सय्यद यांचे प्रतिपादन, जनशिक्षण संस्थेच्या प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वितरण, कौशल्य, आत्मनिर्भरता आणि उद्योजकतेकडे महिलांची वाटचाल

नगर – आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शिक्षण पुरेसे नाही, तर त्यासोबत कौशल्य असणे अत्यावश्यक आहे. जनशिक्षण संस्था ग्रामीण व शहरी भागातील महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम सातत्याने करत आहे. महिलांनी शिकलेल्या कौशल्यांचा उपयोग करून लघुउद्योग, घरगुती व्यवसाय, शिवणकाम, फॅशन डिझाईनिंग, हस्तकला अशा विविध क्षेत्रांत स्वतःचा व्यवसाय सुरू करावा, असे आवाहन जनशिक्षण संस्थेचे प्रभारी संचालक शफाकत सय्यद यांनी केले.



जनशिक्षण संस्थेच्या प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमामध्ये राहुरीच्या माजी नगराध्यक्षा व नगरसेविका उषाताई तनपुरे, शफाकत सय्यद आदी.

महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण देत त्यांना आत्मनिर्भरतेचा मार्ग दाखवणाऱ्या जनशिक्षण संस्था यांच्या माध्यमातून राहुरी येथील महिलांना विविध कौशल्याधारित प्रशिक्षण देण्यात आले. जनशिक्षण संस्था संचलित रुपाली फॅशन इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना नुकतेच प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. प्रशिक्षणार्थी महिलांची मेहनत, जिद्द आणि यशाचा गौरव करण्यासाठी हा विशेष सोहळा आयोजित करण्यात आला होता.

राहुरी येथील संत नामदेव महाराज हॉल येथे झालेल्या या कार्यक्रमाला राहुरीच्या माजी नगराध्यक्षा व नगरसेविका उषाताई तनपुरे, जनशिक्षण संस्थेचे प्रभारी संचालक शफाकत सय्यद, कार्यक्रम अधिकारी कुंदा शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) चे वरिष्ठ संशोधन अधिकारी दिलावर सय्यद, सेपिअन्स रिसर्च महिला सबलीकरण विभागाच्या डॉ. मनीषा गालफाडे, बार्टीचे एजाज पिरजादे, रुपाली फॅशन इन्स्टिटयूटच्या संचालिका रुपाली चुंबळकर, अजय चुंबळकर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली. पाहुण्यांचे स्वागत वृक्षसंवर्धनाचा संदेश देत रोप देऊन तसेच प्रशिक्षणार्थी महिलांनी तयार केलेल्या हस्तकलेच्या वस्तू भेट देऊन करण्यात आले.

उषाताई तनपुरे यांनी आपल्या मनोगतात महिलांना प्रोत्साहन दिल्यास समाजाची सर्वांगीण प्रगती होईल, असे सांगितले. महिलांमध्ये असलेल्या विविध कलागुणांना व्यावसायिक प्रशिक्षणाद्वारे चालना मिळते. राहुरी नगरपालिकेच्या वतीने महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

जनशिक्षण संस्थेचे प्रभारी संचालक शफाकत सय्यद म्हणाले की, आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शिक्षण पुरेसे नाही, तर त्यासोबत कौशल्य असणे अत्यावश्यक आहे. जनशिक्षण संस्था ग्रामीण व शहरी भागातील महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम सातत्याने करत आहे. महिलांनी शिकलेल्या कौशल्यांचा उपयोग करून लघुउद्योग, घरगुती व्यवसाय, शिवणकाम, फॅशन डिझाईनिंग, हस्तकला अशा विविध क्षेत्रांत स्वतःचा व्यवसाय सुरू करावा.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन महिला बचत गटांच्या माध्यमातून सामूहिक व्यवसाय उभारू शकतात. प्रशिक्षण म्हणजे केवळ प्रमाणपत्र नव्हे, तर तो आत्मविश्वासाचा पाया आहे. महिलांनी स्वतःवर विश्वास ठेवून पुढे आले तर समाजातील आर्थिक व सामाजिक परिवर्तन शक्य आहे. जनशिक्षण संस्था भविष्यातही अधिकाधिक महिलांपर्यंत प्रशिक्षण पोहोचवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

बार्टीचे वरिष्ठ संशोधन अधिकारी दिलावर सय्यद यांनी महिलांनी उद्योग–व्यवसायात पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. शासकीय योजनांच्या सहाय्याने आणि योग्य मार्केटिंगच्या माध्यमातून प्रशिक्षणाचा सदुपयोग करून आत्मनिर्भर व्हावे, असे त्यांनी सांगितले.

रुपाली फॅशन इन्स्टिटयूटच्या माध्यमातून अनुसूचित जातीतील महिलांना विविध प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी केलेल्या सामाजिक कार्याबद्दल सौ. रुपाली चुंबळकर व अजय चुंबळकर यांचा बार्टीच्या वतीने सन्मान करण्यात आला.

यावेळी भारती पवार, निलम पवार, स्मिता मगरे, रोहिणी गुजर, सीमा ठोकळे, राजश्री गाडे यांनी प्रशिक्षणाच्या अनुभवांबाबत मनोगत व्यक्त करत कृतज्ञता व्यक्त केली. यशस्वी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गितीका इंगळे यांनी केले. सुवर्णा खैरनार यांनी आभार मानले.

# 'सोनी टीव्ही'वरील 'मास्टर शेफ'मध्ये नगरच्या दीपाली बिहाणी यांचा सहभाग



नगर – दूरचित्रवहिनी सोनी टीव्हीवरील 'मास्टर शेफ इंडिया' रिॲलिटी शो स्पर्धेत अहिल्यानगरच्या दीपाली बिहाणी यांनी स्थान मिळवले. या स्पर्धेत स्पर्धकांनी विविध खाद्यपदार्थ बनवायचे होते. त्याचे चित्रीकरण मायानगरी मुंबईत मालाड येथील स्टुडिओमध्ये करण्यात आले. या रिॲलिटी शोमध्ये सहभागी होण्यासाठी ७ हजार स्पर्धकांनी भाग घेतला होता. त्यामुळे स्पर्धा कठीण होती. स्पर्धेच्या एकूण ७ बाद फेर्या होऊन आठव्या फेरीत मास्टर शेफसाठी बारा स्पर्धक निवडले गेले. दीपाली बिहाणी यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करत बारा स्पर्धकामध्ये स्थान मिळवले. यासाठी वेगवेगळ्या पदार्थांचे सादरीकरण आणि चव पारखली गेली. या स्पर्धेसाठी रणवीर ब्रार, कुणाल कपूर, विकास खन्ना यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. सुगरणींनी नवनवीन खाद्यपदार्थ बनवून पारंपरिक आणि प्रादेशिक भारतीय पदार्थांचा मिलाप साधत प्रेक्षकांची आणि परीक्षकांची मने जिंकली. 'मास्टर शेफ इंडिया' हा एक भारतीय कुकींग शो महाराष्ट्रातील सुगरणींसाठी आपले पाककौशल्य सिद्ध करण्याचे एक व्यासपीठ आहे.

दीपाली बिहाणी या जळगावमधील अडावद येथील उद्योजक ओमप्रकाश दहाड यांच्या कन्या आहेत. मूळचे वांबोरी आणि सध्या नगरमध्ये स्थायिक असलेले डॉ. सुरेश बिहाणी व तारा बिहाणी यांच्या त्या स्नुषा आहेत. सागर सर्जिकलचे अभिजीत बिहाणी यांच्या पत्नी आहे. दीपाली बिहाणी यांनी मास्टर शेफ स्पर्धेत भाग घेण्याआधी 'बेटर किचन्स' द्वारे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील स्वयंपाक स्पर्धेत 'किचन स्टार ऑफ इंडिया' हा किताबही मिळवला आहे. मराठी न्यूज चॅनल आणि मंगलम् वेडिंग डेस्टीनेशन क्लब आयोजित 'किचन क्वीन' स्पर्धेतही त्यांनी सहभाग घेतला होता. 'मास्टर शेफ दीपालीज किचन' या नावाने सोशल मीडियावर त्या नवनवीन पाककृती आणि स्वयंपाकाची कौशल्ये शेअर करत असतात. विविध दूरचित्रवाहिन्यांवर त्यांनी पाककृती सादर केल्या आहेत. अनेक मासिकांमध्ये त्यांचे पदार्थ प्रसिद्ध झाले आहेत. मास्टर

'मास्टर शेफ ऑफ इंडिया' हा रिॲलिटी शो हा सोनी टीव्हीवर प्रसारित होत आहे.

# श्री संतश्रेष्ठ जगद्गुरू तुकाराम महाराज बिजोत्सवनिमित्त २७ फेब्रुवारीपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

नगर – सालाबादप्रमाणे कुलवंतवाणी समाजाच्या गंज बाजार येथील शेंगागल्लीतील श्री विठ्ठल मंदिरात तुकाराम बीजोत्सवानिमित्त २७ फेब्रुवारी ते ६ मार्च या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत, अशी माहिती कुलवंतवाणी समाज विठ्ठल मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष व विश्वस्त यांनी दिली.

या कार्यक्रमाचा प्रारंभ २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वा. अभिजित शेटे व सौ. कोमल शेटे यांच्या हस्ते श्री विठ्ठल रूख्मिणीची महापुजा होईल. दररोज सकाळी ८ ते दुपारी १ हभप विनायक महाराज काळे यांचे गाथा पारायण होईल. भोजन विश्रांती दुपारी १ ते ३, भजन :– दररोज दुपारी ३.३० ते ५ वा., हरिपाठ :– दररोज सायं. ५ ते ६ वा., किर्तन :– दररोज सायं. ६ ते ८ वा. यावेळेत होईल.

यामध्ये २७ फेब्रुवारी रोजी ज्ञानमऊली महिला भजनी मंडळ, श्रीराम चौक, २८ फेब्रुवारी रोजी जीवनकला भजनी मंडळ, गणेश कॉलनी, सावेडी नाका, १ मार्च रोजी रेणुका महिला भजनी मंडळ, टिळक रोड, २ मार्च रोजी बालाजी महिला भजनी मंडळ, तापीदास गल्ली, ३ मार्च रोजी राधाकृष्ण रेणुका महिला भजनी मंडळ, सारसनगर, ४ मार्च रोजी संत नामदेव महिला भजनी मंडळ, शिंदे मळा ही मंडळे भजन सेवा देणार आहेत.

त्याचप्रमाणे २७ फेब्रुवारी रोजी हभप संत चरित्रकार राधिकाताई राऊत, केडगाव, २८ फेब्रुवारी रोजी हभप संगीत विशारद ज्ञानेश्वरीताई सुंबे, घोसपुरी, १ मार्च रोजी हभप सुरज महाराज, ससेवाडी, २ मार्च रोजी हभप वाणीभूषण शकुंतलाताई अंभोरे, शेगाव संस्थान, ३ मार्च रोजी हभप गायनाचार्य कार्तिकीताई सुर्यवंशी, पारनेर, ४ मार्च रोजी हभप सईताई सगळे, बीड हे कीर्तनसेवा देणार आहेत.

वैकुंठ गमनाचे ५ मार्च रोजी सकाळी १० ते १२ हभप कथाव्यास वैशालीताई शेंडे (पिंपळनेर), दुपारी १२ ते १ शोभा यात्रा, महाप्रसाद दुपारी १.३० ते ३.३० वा. या वेळेत होईल.

अभिजित शेटे व श्रीमती मंदाताई शेटे यांच्यातर्फे महाप्रसाद सेवा देण्यात येणार आहे. युवा किर्तनकार ह. भ. प. गणेश महाराज शेंडे (अध्यक्ष निळोबाराय वारकरी शिक्षण संस्था, पिंपळनेर) यांचे काल्याचे किर्तन ६ मार्च रोजी सकाळी १० ते १२ वा. यावेळेत होईल. चोपदार म्हणून सारसनगर येथील हभप अनारसे मामा हे असणार आहेत.

तुकाराम महाराज बिजोत्सवानिमित्त विविध स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले असून स्पर्धा सर्व वयोगटासाठी खुल्या असून वयोमर्यादेचे बंधन असणार नाही. यामध्ये रांगोळी स्पर्धा २८ फेब्रुवारीला ३ ते ५ यावेळेत होईल. नावनोंदणीसाठी सौ. कांचनताई सिद्ध (मो.९४२१०९९८८७), सौ. मनिषाताई उबाळे (८०१०३३२५६२) यांच्याशी संपर्क साधावा. रांगोळी स्पर्धेसाठी सौ. सुचिताताई देवचक्के या पर्यवेक्षक आहेत.

पाक कला स्पर्धा १ मार्च रोजी सायं.४ ते ६ यावेळेत होईल. नाव नोंदणीसाठी सौ. गौरीताई आरे (मो.९५८८४८७९९८), सौ. विद्याताई आरे (८२०८०५६५६०) यांच्याशी संपर्क साधावा. पर्यवेक्षक म्हणून सौ. आसावरीताई नातू या आहेत.

पूजा थाळी डेकोरेशन स्पर्धा ३ मार्च रोजी सायं.४ ते ६ यावेळेत होत असून नावनोंदणीसाठी सौ. सुप्रियाताई धावडे (मो.९०२८९६८८३१), सौ. सपनाताई तांबोळी (९०७५००१४०३) यांच्याशी संपर्क साधावा. पर्यवेक्षक म्हणून सौ.लतिकाताई झंवर या आहेत. वेशभुषा कार्यक्रम ५ मार्च रोजी मिरवणुकीमध्ये करण्यात येईल.

अन्नदानासाठी कुमार शेटे, श्रीमती जयश्रीताई धावडे, सतिश शेटे, सुदेश बिडवे, सुनील सिद्ध, सतिश आरे, सुनील आरे, नंदकुमार धामणगावकर, श्रीमती जमनाभाभी काबरा, शोभजी काबरा, रामकुंवर बलदवा, मंगल झंवर, सोमनाथ काबरा, राजेश भोसले, संदीप पवार, महादेव पाटील, तापस पाखिरा, श्रीनिवास चिलवर, तेजस चिंचणकर, समाधान भोसले, किरणराव शिंदे, स्वप्निल शेटे, ज्ञानेश्वर शेटे, गणेश शेटे, विशाल तांबोळी आदींचे सहकार्य आहे. माहितीसाठी ९२७००६४०४८.

# कॅलिडोस्कोप

## कॅसिनो नव्हे, डे केअर सेंटर



जपानसारख्या देशात ज्येष्ठांची संख्या झपाट्याने वाढत होती. त्यांची काळजी, देखभालीचे प्रश्न ऐरणीवर आले होते. म्हणूनच टोकियोमध्ये ज्येष्ठांसाठी डे केअर सेंटर तयार करण्यात आलं. सर्व्हिस लास वेगास नावाने हे डे केअर सेंटर चालवलं गेलं. इथे ज्येष्ठांच्या करमणुकीची सर्व सुविधा उपलब्ध करून दिली गेली. कॅसिनो थीवर आधारित या डे केअर सेंटरमध्ये विनिंग फॉर्म्युला मशीन्स बसवण्यात आली. या माध्यमातून ज्येष्ठ नागरिक गेम्स खेळू शकतात. जपानमध्ये जुगारावर बंदी आहे. कोणीही पैसे लावून जुगार खेळू शकत नाही. मात्र आपण फक्त आनंदासाठी इथे गेम्स खेळत असल्याचं ज्येष्ठ नागरिक सांगतात. जपानमध्ये ज्येष्ठांची संख्या वाढत चालल्याने अनेकांना एकाकी आयुष्य व्यतीत करावं लागतं. त्यांचा एकटेपणा दूर करण्यासाठी कॅसिनो थीमवर आधारित डे केअर सेंटर सुरू करण्यात आलं. ज्येष्ठ नागरिक अशा ठिकाणी निवांत वेळ घालवू शकतात. ज्येष्ठांसाठीचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे.

## असा जमवला निधी

बंगळूरुतल्या विद्याशिल्प अकादमीतल्या विद्यार्थ्यांनी विधायक कामासाठी पुढाकार घेतला. त्यांनी ज्येष्ठांच्या डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी निधी गोळा करून अनेकांपुढे आदर्श उभा केला. अकादमीच्या ११० विद्यार्थ्यांनी मिळून हा निधी उभा केला. या उपक्रमाची सुरुवात चार विद्यार्थ्यांनी केली होती. ३५८० ज्येष्ठांसाठी त्यांनी निधी गोळा केला. ती रक्कम ३५ लाख रुपयांपर्यंत पोहोचली. विशेष म्हणजे या विद्यार्थ्यांनी फक्त दहा दिवसात ही कामगिरी करून दाखवली. सुरुवातीला २४०० ज्येष्ठांसाठी २२ लाख रुपये निधी जमवण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं होतं. मात्र नंतर हा आकडा वाढवण्यात आला.

क्राउड फंडिंगच्या माध्यमातून हा निधी उभा राहिला. सुरुवातीच्या टप्प्यात चार विद्यार्थ्यांनी एक लाख रुपयांपेक्षा अधिक रक्कम जमवली. खुशी कर्मकार, गायत्री थम्पी, मिहिका आणि करण ददलानी या विद्यार्थ्यांनी ही मोहीम राबवली होती. त्यानंतर नववी, दहावी, अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांनीही यासाठी पुढाकार घेतला. या शाळेतले विद्यार्थी सामाजिक कार्यासाठी नेहमीच पुढाकार घेतात. विद्यार्थ्यांच्या या कार्याचं आणि त्यांना मदत देणाऱ्यांचं कौतुक करावं तेवढं कमी आहे.



## विमानात पॅराशूट का नसतात?




अलीकडच्या काळात विमान अपघाताच्या अनेक घटना घडल्या. ट्रेनचा अपघात झाला, किंवा एखाद्या दुसऱ्या वाहनाचा अपघात झाला, तर त्यामधून वाचण्याची थोडीतरी शक्यता असते, मात्र विमानाचा अपघात होतो तेव्हा प्रवासी वाचण्याची शक्यता नसते. अशा परिस्थितीमध्ये विमानात पॅराशूट का नसते, असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. विमानात पॅराशूट असेल तर अपत्कालीन स्थितीमध्ये प्रवासी या पॅराशूटचा उपयोग करून आपला जीव वाचवू शकतात, असे वाटू शकते. मात्र जीव वाचवण्याचा हा उपाय वाटतो तेवढा सहज सोपा नाही.



प्रवासी विमाने आकाराने प्रचंड मोठी असतात. या विमानांमधून एकाचवेळी शेकडो लोक प्रवास करतात. त्यामुळे प्रत्येक प्रवाशाच्या सीटखाली एक पॅराशूट ठेवले तर प्रवाशांचा जीव वाचवणे आणखी अवघड बनेल. फायटर जेटमध्ये पॅराशूट असते, मात्र प्रवासी विमानामध्ये पॅराशूट नसते. कारण दोन्ही विमानांची रचना आणि काम वेगवेगळे असते. प्रवासी विमान सर्वसामान्यपणे ३० हजार ते ४० हजार फूट उंचीवरून उड्डाण करते. एवढ्या उंच हवेत ऑक्सिजनची पातळी ही अतिशय कमी असते. तसेच तापमानदेखील शून्य अंश सेल्सिअसच्या खाली असू शकते. अशा परिस्थितीत एखाद्या व्यक्तीने पॅराशूटच्या मदतीने विमानातून उडी मारली तर कोणतेही ट्रेनिंग नसल्यामुळे त्याला हवेत श्वास घेता येणार नाही, तसेच अचानक त्याच्या शरीरातील तापमान कमी होईल. त्याचा मृत्यू देखील होऊ शकतो.

विमानाचा वेग ताशी ८०० ते ९०० किमी एवढा प्रचंड असतो. अशा परिस्थितीत एखाद्या प्रवाशाने विमानातून उडी मारली तर त्याचा मृत्यू होऊ शकतो. विमानात शेकडो प्रवाशी असतात, विमानाच्या दरवाजाच्या आणि खिडक्यांच्या विशिष्ट रचनेमुळे ते लवकर उघडत नाहीत. चुकीच्या वेळी उघडले गेले तर मोठा अपघात होऊ शकतो. त्यामुळे विमानात पॅराशूट ठेवण्यात येत नाही.

## देशातील लांब पूल!



भारतातील सर्वात मोठा उड्डाणपूल बांधण्याचे काम सुरू आहे. हा अरूर-थुरावूर उन्नत महामार्ग म्हणून ओळखला जातो. याची लांबी १२.७५ किलोमीटर इतकी आहे आणि तो सहा लेनचा असणार आहे. हा उड्डाणपूल राष्ट्रीय महामार्ग ६६ चा भाग आहे. या प्रकल्पामुळे स्थानिक भागाच्या विकासाला चालना मिळेल. हा उड्डाणपूल पूर्णपणे उन्नत असल्याने खालील वाहतुकीला अडथळा येणार नाही. सहा लेन असल्यामुळे दोन्ही दिशांना वाहने सहज जाऊ शकतील. याची रचना अशी आहे की, तो एका स्तंभावर आधारित आहे. त्यामुळे तो देशातील सर्वात अनोखा आणि लांब पूल ठरेल. या महामार्गामुळे दक्षिण भारतातील राज्यांना जोडण्यात मदत होईल. या मोठ्या प्रकल्पासाठी सुमारे २२०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण म्हणजेच एनएचएआय या पूलाचे बांधकाम करत आहे. या प्रकल्पात अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि साहित्य वापरले जात असल्याने तो मजबूत आणि टिकाऊ असेल.

आतापर्यंत बांधकामाचे बहुतेक भाग पूर्ण झाले आहेत. ३६० आधार स्तंभ आणि ३००० गर्डर तयार झाले आहेत. गर्डर बसवण्याचे काम सुरू आहे. तीन निर्गमन रस्ते आणि एक टोल केंद्र सुरू करण्यात आले आहे. या प्रकल्पात २५०० कामगार आणि ३५० मशीन्स दिव-सरात्र काम करत आहेत. मे २०२६ पर्यंत हा पूल पूर्ण होण्याची शक्यता आहे. हा पूल एकल स्तंभावर आधारित आहे. ६ लेन असल्यामुळे वाहतुकीची क्षमता जास्त आहे. प्रवाशांना या मार्गावरून जाण्यासाठी टोल भरावा लागेल. त्यामुळे देखभालीसाठी निधी मिळेल.

या पूलाची रचना पर्यावरणस्नेही आणि सुरक्षित आहे. यामुळे दुर्घटना कमी होतील आणि प्रवास आरामदायक होणार आहे. या पुलामुळे तमिळनाडू आणि कर्नाटक राज्यांमधील जोडणी जलद आणि सोपी होईल. वाहतुकीचा खर्च कमी होईल, वेळ वाचेल आणि प्रवाशांची सोय होईल. केरळच्या रस्ते पायाभूत सुविधेत मोठी सुधारणा होईल.

## सेल्फीतून कमाईची रशियन आयडिया

अनेक लोकांना परदेशी लोकांसोबत फोटो काढण्याची किंवा सेल्फी घेण्याची भारी हौस असते; मात्र भारत दौऱ्यावर आलेल्या एका रशियन महिलेने त्यातून कमाईचा एक नवा मार्ग शोधला. ही रशियन महिला सेल्फी काढण्यासाठी स्थानिक लोकांकडून शंभर रुपये घेत असल्याचे आढळल्याने चर्चेला तोंड फुटले. एका व्हायरल व्हिडिओमध्ये भारतात प्रवास करत असलेल्या रशियन महिलेला स्थानिकांकडून सतत सेल्फीच्या विनंतीला सामोरे जावे लागत होते. परिणामी, तिने प्रत्येक सेल्फीसाठी शंभर रुपये आकारायला सुरुवात केली. त्या महिलेने फोटो काढण्याच्या हट्टापासून वाचण्याचा मार्ग शोधला खरा; परंतु त्यातून तिला उत्पन्नाचा नवा मार्ग सापडला. व्हिडीओच्या सुरुव-तीला ती सेल्फीची नक्कल करत म्हणते, मॅडम, प्लीज, एक फोटो? एक फोटो? मग ती एक साइन बोर्ड काढते आणि लोकांसमोर धरते. त्यावर एक सेल्फी, शंभर रुपये असे लिहिलेले असते.

हा व्हिडीओ इन्स्टाग्रामवर शेअर करण्यात आल्यापासून लाखो लोकांनी तो पाहिला. सोशल मीडिया यूजर्स व्हिडीओबाबत वेगवेगळ्या प्रतिक्रिया देत आहेत. एका वापरकर्त्याने लिहिले, प्राप्तिकराची मागणी होत असल्यास काळजी करू नका. तर दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले, तुम्हाला इन्कम टॅक्स विभागाकडून नक्कीच कॉल येईल.




## नदीतून येणार महात्सुनामी!

जगात अनेक विनाशकारी घटना घडल्या आहेत. पण पहिल्यांदाच समुद्रातून नाही, तर नदीतून महात्सुनामी येणार आहेत. हिमालयाच्या शिखरांवरील बर्फ आता जीवनदायी नद्यांऐवजी हिमनदी त्सुनामीचा धोका बनला आहे. त्यामुळे सुमारे ९३ लाख लोकांचा जीव धोक्यात आहे.

आयआयटी रुरकीच्या एका अभ्यासानुसार, हिमालयीन प्रदेशातील हिमनदी तलावांचे क्षेत्रफळ ५.५ टक्क्यांनी वाढले आहे. या ३१ हजारांहून अधिक अस्थिर तलावांमुळे ९३ लाख लोकांना ग्लेशियर लेक आउटबर्स्ट फ्लड (जीएलओएफ) चा धोका निर्माण झाला आहे. एकट्या भारतात ३० लाख लोक या तलावांजवळ राहतात.



शास्त्रज्ञांनी उपग्रहांनी पाठवलेला डेटा वापरून इशारा दिला आहे, की जागतिक तापमानवाढीमुळे केदारनाथसारखी आपत्ती पुन्हा येऊ शकते. सायंटिफिक रिपोर्ट्समध्ये या हिमालयीन त्सुनामीचा अहवाल प्रकाशित झाला आहे. रवींद्र कुमार आणि सौरभ विजय यांच्या टीमने हा व्यापक अभ्यास केला आहे. संशोधन अहवालानुसार २०१६ ते २०२४ दरम्यान हाय माउंटन आशिया (एचएमए) प्रदेशातील या तलावांचे क्षेत्रफळ ५.५ टक्क्यांनी वाढले आहे. सध्या, असे ३१ हजारांहून अधिक तलाव आहेत. यामुळे ९३ लाख लोकांसाठी थेट धोका निर्माण झाला आहे.

पर्वतांमधील हिमनद्या वितळतात तेव्हा त्यांचे पाणी पोकळीत जमा होते आणि तलाव तयार होतात. हे तलाव कायमस्वरूपी धरणांनी वेढलेले नसून, सैल खडक, बर्फ आणि ढिगाऱ्यांच्या (मोरेन) नैसर्गिक धरणांनी वेढलेले असतात. जागतिक तापमानवाढीमुळे पाण्याचा दाब वाढतो किंवा हिमस्खलन या तलावांवर येते तेव्हा ही धरणे फुग्यांसारखी फुटतात. याला ग्लेशियर लेक आउटबर्स्ट फ्लड (ग्लोफ) किंवा हिमालयीन त्सुनामी म्हणतात. २०१३ मधील केदारनाथ दुर्घटना आणि २०२३ मधील सिक्कीम पूर ही या धोक्याची प्रमुख उदाहरणे आहेत. हे तलाव इतक्या उंचीवर आहेत, की त्यांचे पाणी प्रचंड वेगाने खाली येते. ते पाणी जणू एक हलणारा पर्वत बनते. हा पर्वत दगड, माती आणि झाडे सोबत घेऊन जातो आणि त्याच्या मार्गातील सर्व काही नष्ट करतो.


## कबुतराला खाऊ घालणे पडले महागात!

सिंगापूरमधील एका ७१ वर्षीय महिलेला वारंवार वन्य पक्ष्यांना खायला दिल्याबद्दल ३,२०० डॉलर्स (दोन लाख २७ हजार ८४५ रुपये) दंड ठोठावण्यात आला आहे. यापूर्वी तिच्यावर कारवाई झाली होती, परंतु तिने पुन्हा असे न करण्याचे आश्वासन दिले होते. सीएनएच्या अहवालानुसार षण्मुगनाथन शामला यांना वन्यजीव कायद्यांतर्गत चार आरोपांमध्ये दोषी ठरवण्यात आले.

शामला यांच्यावर कायदेशीर कारवाई होण्याची ही पहिलीच वेळ नाही. गेल्या वर्षी मे महिन्यात याच गुन्ह्यासाठी आणि पक्षी पकडण्याच्या कामात हस्तक्षेप केल्याबद्दल त्यांना १,२०० डॉलर्स दंड ठोठावण्यात आला होता. त्या वेळी त्यांनी आपण पुन्हा असे करणार नाही, असे न्यायालयाला सांगितले होते. मात्र त्या फक्त एका महिन्यात आपल्या जुन्या सवयींकडे परतल्या. सरकारी वकिलांनी जुलै २०२५ ते जानेवारी २०२६ दरम्यान नऊ वेगवेगळ्या प्रसंगी शामला यांनी कबुतरांना धान्य आणि ब्रेड खायला दिल्याचे पुरावे सादर केले. न्यायालयात दाखवलेल्या व्हिडीओ फुटेजमध्ये ती महिला टोआ पायो येथील तिच्या फ्लॅटजवळ पक्ष्यांनी वेढलेली दिसत होती. शामला चुकीबद्दल पश्चात्ताप व्यक्त करण्यासाठी एका खासदारालाही भेटल्या होत्या. तरी तीन दिवसांनंतर त्या पुन्हा पक्ष्यांना खाऊ घालताना पकडल्या गेल्या.



सरकारी वकिलांनी त्यांच्या कृतीचे वर्णन कायद्याचे सतत उल्लंघन असे केले आणि त्यांना रोखण्यासाठी मोठा दंड आवश्यक असल्याचा युक्तिवाद केला. शामला यांनी न्यायालयाला कमी दंडाची विनंती केली आणि त्याऐवजी सामुदायिक सेवा करण्याची ऑफर दिली. तथापि, न्यायाधीशांनी ३,२०० डॉलरचा दंड ठोठावल्यानंतर आपण ही रक्कम ताबडतोब भरू, असे सांगितले. यापुढेही ही सवय कायम राहिल्यास त्यांना प्रत्येक आरोपासाठी दहा हजार डॉलरचा जास्तीत जास्त दंड होऊ शकतो.




## इथे लपून बसा

अमेरिकेतल्या ओक्लाहोमा शहरातल्या वोर्टेक्स वॉल्ट या कंपनीने अनोखा पलंग तयार केला. अत्याधुनिक सोयी-सुविधांनी युक्त असा हा पलंग वेळप्रसंगी आपला जीवही वाचवू शकतो. या पलंगात आपण लपू शकतो. भूकंप, पूर, वादळ अशा प्रसंगांमध्ये आपण या पलंगाच्या आत सुरक्षित राहू शकतो. हा पलंग तयार करण्यासाठी अत्यंत कठोर अशा स्टीलचा वापर करण्यात आला असून तो तुटत नाही. पलंगाच्या किनाऱ्यालगत तीन छोटे दरवाजे आहेत. हे दरवाजे उघडून आपण आत जावून बसू शकतो. याला शेल्टर बेड हे नाव देण्यात आले. रिमोटचा वापर करून हा पलंग उघडता आणि बंद करता येतो. पलंगात चार मोटर सीजर लिफ्ट मॅकेनिझम बसवण्यात आले. वीज नसताना बॅटरी बॅकअप मिळू शकतो. नैसर्गिक आपत्तीदरम्यान पलंग उघडता आला नाही तरी रांगत त्याच्या आत लपण्याची सोय आहे.

## कॅन्सचा असा पुनर्वापर


पर्यावरणाचा बचाव करण्यासाठी विविध वस्तूंचा पुनर्वापर करण्याची गरज व्यक्त होते आहे. अनेकजण असा पुनर्वापर करत असतात. या बाबतीत आपण चीनमधला एक शेतकरी दाई चँगलिनचं उदाहरण समोर ठेऊ शकतो. दाई कोल्डड्रिंक आणि बीअरच्या कॅन्सपासून खेळणी तयार करतो. तो फक्त पाच रुपयांना कॅन खरेदी करतो. त्यापासून खेळणी तयार करतो आणि भारतीय चलनात पाच हजार रुपयांना विकतो. त्याने गेल्या पाच वर्षांमध्ये कॅन्सपासून आठ हजार विमानं आणि गाड्या तयार केल्या आहेत. दाई चीनमधल्या हेनात प्रांतातल्या लुयोनिंग शहरात रहातो. विविध पेयांचे कॅन्स तो विकत घेतो. त्याच्याकडे असंख्य कॅन्स आहेत. शेतीच्या कामातून वेळ काढून तो हे काम करतो. अशाप्रकारे खेळणी बनवल्याने कचऱ्याचं प्रमाण खूप कमी होतं. कॅन्सपासून खेळणी बनवण्यासाठी तो बरीच मेहनत घेतो. विविध प्रकारची तंत्र वापरतो. त्याच्या या कामाचं चीनमधून खूप कौतुक होतं. आपणही अशा पद्धतीने कचऱ्याचं प्रमाण कमी करू शकतो.



## स्टंट की माणुसकी?

एखाद्या दुचाकीमधील पेट्रोल संपले, की माणुसकीच्या भावनेतून दुसरा दुचाकीस्वार त्याला मदत करतो. अनेकदा रस्त्यावर, गावात, शहरात दुचाकीला पायाने धक्का देत दुसरा दुचाकीस्वार पेट्रोल पंपापर्यंत किंवा इच्छित स्थळापर्यंत पोहोचवतो; मात्र चक्क बसमधील वाहकाने आपला पाय बाहेर काढून एखाद्या रिक्षाला धक्का देत माणुसकी दाखवली. मात्र ही माणुसकी होती की स्टंट असाही प्रश्न अनेकांना पडला.

बसच्या वाहकाने स्वतःच्या आणि प्रवाशांच्या जीवाशी खेळ केल्याची तक्रार अनेकांनी केली. त्यानंतर, संबंधितावर कारवाई करण्यात आली. चालत्या बसच्या दारात उभे राहून रिक्षाला धक्का मारण्याची स्टंटबाजी सिटीलिंक बसच्या वाहक-चालकांच्या चांगलीच अंगलट आली असून दोघांनाही निलंबित करण्यात आले. नाशिकमधील बस आणि रिक्षाचा हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर परिवहन विभागाने संबंधित बसच्या चालक-वाहकावर कारवाई केली.



बसमधील वाहक बसच्या फुटस्टेपवर एक पाय ठेऊन उभे राहून दुसऱ्या पायाने रिक्षाला धक्का देत असल्याचे व्हिडिओमध्ये दिसून येते. रिक्षावाल्याच्या मदतीसाठी त्याने एक पाय आणि एक हात लावला. बसमधील वाहकाने जीव धोक्यात घालून माणुसकीच्या भावनेतून रिक्षाला धक्का मारतानाचा व्हिडीओ व्हायरल होताच सिटीलिंकच्या कारभाराबाबत टीका सुरू झाली.

या प्रकारावर बसमधील प्रवाशांसह स्वतःच्या जीवाशीही खेळ होत असल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या. मागील आठवड्यातच सिटीलिंक प्रशासनाने पोलिसांना पत्र लिहून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या, भरधाव बस चालवणाऱ्यांचे व्हिडीओ मागवले असताना हा प्रकार उघडकीस आल्याने तत्काळ संबंधित बसचालकावर निलंबनाची कारवाई करण्यात आली.

